कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांना दिनांक ०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय : मुदतवाढ २०१८/प्र.क्र.८७/मोप्र-२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६/०४/२०१८

पहावे : १. शासन निर्णय क्रमांक - मुदतवाढ २०१७/(१६०/१७)/मोप्र-२, दिनांक १६/०५/२०१७.
२. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्रमांक २१/विपाविम/काआ-३/ महामंडळ १० पदे/ मुदतवाढ/२०१८, दिनांक ०१/०१/२०१८
३. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्रमांक १७६५/विपाविम/काआ-३/ महामंडळ १० पदे/ मुदतवाढ/२०१७, दिनांक २३/०२/२०१८.
४. वित्त विभागाचा शासन निर्णय क्र पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आपुक., दि.०३/१०/२०१७, दि.०८/०१/२०१८, दि. ०५/०३/२०१८

प्रस्तावना :-

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १० पदांना दिनांक ३०/०९/२०१७ पर्यंत संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती. सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयांन्वये मुदतवाढ देण्याचे अधिकार देण्यात आले आहे.

शासन निर्णय :-

आता संदर्भीय क्र. २ व ३ अन्वये कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार सोबतच्या **परिशिष्ट- अ** मधील नियत अस्थायी आस्थापनेवरील १० पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गंतवणूक, (०४) वेतनावरील खर्चासाठी भागभांडवली अंशदान (योजनेतर), (०४)(०२) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (संगणक संकेतांक (४७०१ आय १७१) (दत्तमत)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व त्याखालील मंजूर अनुदानातून भागवावा.

हे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आपुक., दिनांक ०३/१०/२०१७, दिनांक ०८/०१/२०१८, दिनांक ०५/०३/२०१८ यानुसार विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२६१७३१२४५६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Abhay Keshaorao Yedsikar

Digitally signed by Abhay Keshaorao Yedsikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5724dd2e45895f7c2ab554c8d0b0041f388e5f397467c37bb907e6cc635bd0fd, cn=Abhay Keshaorao Yedsikar
Date: 2018.04.26 17:35:42 +05'30'

(अभय येडसीकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : **परिशिष्ट - "अ"**

प्रत : सहपत्रासह

१. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
२. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३. वित्त विभाग /(व्यय-१२), मंत्रालय, मुंबई.
४. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
५. मोप्र-२ संग्रहार्थ.

परिशिष्ट - अ

शासन निर्णय : मुदतवाढ २०१८/प्र.क्र.८७/मोप्र-२, दिनांक २६/०४/२०१८

अ.क्र.	कार्यालयाचे नाव		पदनाम	पदसंख्या
१	कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	१	कार्यकारी संचालक	१
		२	मुख्य लेखा व वित्त अधिकारी	१
		३	अधिक्षक अभियंता	१
		४	सहायक संचालक (वित्त)	१
		५	लेखा अधिकारी (महावित्त व लेखा सेवा)	३
		६	सहायक लेखा अधिकारी	३
			एकूण पदे	**१०**